# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
Email ID : education.nmc@gmail.com

जा.क्र. शि.वि. / 3183 / 2016
दि. 17 / 11 / 2016

प्रति,

**सर्व सहा. आयुक्त,**
झोन क्र. 1 ते 10,
म.न.पा. नागपूर

**विषय :– खाजगी व म.न.पा. शाळा तसेच अंगणवाडी विद्यार्थ्यांचे आधारकार्ड झोन व शाळा स्तरावर तयार करण्याबाबत.**

**संदर्भ :– 1) मा. मुख्य सचिव यांचे कार्या. पत्र क्र.CSO -2016/e-1887304/0-1, दि. 17.10.2016**
**2) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी भारतीय वि. पहचान, प्राधिकरण नवि दिल्ली यांचे पत्र क्र. 4(4)/57/315/2016 - E&U-1, दि. 09.11.2016**
**3) या विभागाचे पत्र क्र. शिवि / 3176 / 2016, दि. 15.11.2016**

वरील विषयाच्या अनुषंगाने संदर्भांकित पत्राला अनुसरून कळविण्यात येते की, महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या सर्व खाजगी व मनपा शाळा व अंगणवाडी विद्यार्थ्यांचे झोन व शाळा स्तरावर आधारकार्ड तयार करण्यासाठी दि. 20.11.2016 ते 20.12.2016 पावेतो आधार नोंदणीचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमा दरम्यान शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे आधारकार्ड तयार करण्याचे काम युद्ध पातळीवर राबवून पूर्ण करायचे आहे.

मनपाचे सर्व 10 झोन व झोन अंतर्गत असणाऱ्या मनपाच्या चार शाळांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. संबंधीत झोनचे 10 शाळा निरीक्षक यांना प्रत्येकी 05 संच याप्रमाणे आधार नोंदणी यंत्र तसेच संबंधीत आधार नोंदणी यंत्र ऑपरेटरची यादी उपलब्ध करून देण्यासाठी संदर्भीत पत्र क्र. 3 अन्वये जिल्हाधिकारी नागपूर यांना अवगत करण्यात आले आहे.

तसेच आधार नोंदणी कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्याकरिता आवश्यक व दिशानिर्देश संबंधित सर्व शाळा निरीक्षकांना देण्यात आले आहेत. त्याची प्रत सोबत जोडली असून हा संपूर्ण कार्यक्रम आपले नियंत्रणाखाली राबवून घेण्यात यावा.

(डॉ. रंजना लाडे)
**उपायुक्त–I**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलीपी सादर :**
1) मा. आयुक्त, मनपा नागपर
2) मा. अति. आयुक्त (III) मनपा नागपूर

**प्रतिलीपी :**
1) सर्व शाळा निरीक्षक, झोन क्र. 1 ते 10, मनपा नागपूर
2) सर्व मुख्याध्यापक, माध्यमिक / प्राथमिक, मनपा नागपूर

सोबत जोडण्यात आलेल्या दिशानिर्देशाप्रमाणे आधार कार्ड नोंदणी कार्यक्रम राबविण्यात यावा.

# आधार नोंदणी कार्यक्रमाची रूपरेषा, सोपविण्यात आलेली जबाबदारी व दिशानिर्देश

1) आधार कार्ड नोंदणीची मोहिम दि. 20.11.2016 ते 20.12.2016 या दरम्यान राबविण्यात येईल.
2) या अंतर्गत मनपा, खाजगी व जिल्हा परिषदेच्या शाळा व अंगणवाडयामधील सर्व विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी करण्यात येईल.
3) या माहिमेकरिता व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल या अंतर्गत बॅनर्स लावून आवाहन करणे वर्तमानपत्रात प्रसिद्धी देणे, फेसबूक, वॉट्सअप इत्यादी इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा उपयोग करणे, सर्व शाळांना पत्राद्वारे अवगत करणे इत्यादी बाबींचा समावेश राहील.
4) हा कार्यक्रम झोनस्तरवर व त्या अंतर्गत येणाऱ्या 04 शाळांमध्ये राबविण्यात येईल.
5) ही कार्यवाही सहा. आयुक्त यांचे नियंत्रणाखाली राबविण्यात येईल.
6) संबंधित झोनचे शाळा निरीक्षक व शाळेचे मुख्याध्यापक या मोहिमेकरिता सहा. आयुक्तांच्या अधिनस्थ त्यांचे नियंत्रणाखाली कार्य करतील.
7) आधार नोंदणी यंत्रे जिल्हाधिकारी कार्यालयातून शाळा निरीक्षक प्राप्त करतील व त्याकरिता वाहनाची व्यवस्था झोन स्तरावर संबंधित झोनचे सहा. आयुक्त करतील.
8) आधार नोंदणी यंत्र प्रत्येक झोनमध्ये एक तसेच शाळा निरीक्षक निश्चित करतील. अशा झोन अंतर्गत चार शाळांमध्ये हीं यंत्रे बसविण्यात येतील.
9) मनपाच्या शाळांतील सर्व विद्यार्थ्यांची आधार नोंदणी करण्याची जबाबदारी संबंधित शाळांचे मुख्याध्यापक व शाळा निरीक्षक यांची राहील.
10) आधार नोंदणी यंत्रे लावण्यात आलेल्या शाळा, आधार नोंदणी यंत्र चालक तसचे संबंधित शाळेची सर्व माहिती शाळा निरीक्षक प्राप्त करून ही माहिती सहा. आयुक्त, शिक्षणाधिकारी, सहा. शिक्षणाधिकारी, माध्यमिक/प्राथमिक यांना सादर करतील.
11) म.न.पा. च्या सर्व विभागीय कार्यालयाचे सहा. आयुक्त यांचे नियंत्रणात शाळा निरीक्षक खाजगी तसेच मनपा शाळांचे मुख्याध्यापक अंगणवाडी सेविका यांचे सभा निश्चित करून खाजगी शाळांची यादी प्राप्त करून संबंधित झोनचे शाळा निरीक्षक त्यांच्या झोन अंतर्गत असलेल्या शाळांशी प्रत्यक्ष संपर्क करून आधार नोंदणीच्या तारखांचा कार्यक्रम निश्चित करतील.
12) आधार नोंदणीकरिता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे विद्यार्थ्यांकडून संकलीत करण्याचे कार्य संबंधित मुख्याध्यापक करतील.
13) आधार नोंदणी यंत्र चालक जिल्हाधिकारी कार्यालयातून देण्यात येणार आहेत. याबाबत संबंधित झोनचे शाळा निरीक्षक जिल्हाधिकारी कार्यालयात संपर्क करतील.
14) या कामाची व्यापक प्रसिद्धी झोनस्तरावर करण्यात येईल. यामध्ये बॅनर लावणे, आवाहन करणे, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांचा उपयोग करणे इतयादी बाबींचा समावेश राहील.
15) दररोज प्रत्येक यंत्रावर किमान 35 विद्यार्थी/नागरिकांची आधार नोदणी होईल याची दक्षता शाळा मुख्याध्यापक घेतील.
16) नोंदणी झालेल्या विद्यार्थी/नागरिकांची माहिती दररोज संकलीत करण्याची जबाबदारी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांना देण्यात येत असून ही माहिती मुख्याध्यापक शाळा निरीक्षकांना दररोज सादर करतील.
17) शाळा निरीक्षक आधार नोंदणीचा दैनंदिन अहवाल संबंधित झोनचे सहा. आयुक्त व शिक्षणाधिकारी व मा. उपायुक्त यांना सादर करतील.

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

PC-1\F:\A. S\Subhedar Sir\Letter